
मंथन

# पीक हमीभाव व्यवस्थेतील त्रुटी आणि स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी



**सतीश देशमुख**
(मो.नं. ९८८१४९५५१८)
अध्यक्ष : फोरम ऑफ इंटलेक्च्युअल्स, पुणे







प्रत्येक राज्याची पिकाची हवामान अनुकूलता, उत्पादकता (क्विंटल/ एकर), सिंचन सुविधा, पर्जन्यमान, प्रक्रिया उद्योग, कामगारांची उपलब्धता, क्रयशक्ती यामध्ये विविधता असल्यामुळे राज्यांनी केंद्राकडे शिफारस केलेल्या उत्पादन खर्चात प्रचंड तफावत असते. उदाहरणार्थ पंजाबध्ये ९८% सिंचनाखाली क्षेत्र आहे व महाराष्ट्रात १७.९% आहे. गव्हासाठी पंजाबचे हवामान अनुकूल आहे. त्यामुळे त्यांच्या आकडेवारीवरुन ठरवलेला हमीभाव महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना तोट्याचा आहे.

शेतकऱ्यांनी घाम गाळून उत्पादित केलेल्या पिकांना मिळणारा हमीभाव अत्यंत नगण्य आणि असमाधानकारक असल्याचे वास्तव आहे. हमीभाव ठरविण्याचे निकषही सदोष आहेत. त्यासंदर्भात केलेले हे विवेचन.

**१) हमीभाव जाहीर करण्याची प्रक्रिया व दोष:**

अनुसूचित दिलेल्या एकूण १०९ कृषी उत्पादनांपैकी केंद्र शासन फक्त शेतमालाच्या एकंदरीत २३ पिकांचे न्यूनतम आधारमूल्य (MSP- Minimum Support Price) जाहीर करते. त्यात १४ खरीप, ६ रब्बी व ३ ऊसासारख्या नॉन सिझनल पिकांचा समावेश आहे.

राज्यातील विविध भागांतून पीकनिहाय माहिती– उत्पादन खर्च (Cost of Cultivation) दरवर्षी गोळा करुन चार कृषी विद्यापीठांकडे पाठविण्यात येते. त्यांचे एकत्रीकरण व संकलन राहुरी कृषी विद्यापीठात केले जाते. ही माहिती केंद्र सरकारच्या 'कृषिमूल्य व किंमत आयोगा'ने– CACP (Commission for Agricultural Costs Prices) दिलेल्या स्टँडर्ड फॉरमॅटप्रमाणे गोळा होते. त्या चाकोरीच्या बाहेर जाऊन काही बदल करता येत नाहीत. नंतर ही माहिती राज्याच्या कृषिमूल्य आयोगाकडे पाठविण्यात येते. तिथे बैठकीमध्ये कृषी विद्यापीठांचे तज्ञ/आधिकारी, सांख्यिकी, अर्थतज्ञ, आयोग अध्यक्ष व संबंधित मंत्री यांची चर्चा होऊन अंतिम उत्पादन खर्च केंद्राकडे शिफारस म्हणून पाठविण्यात येतो. राज्य सरकारची उत्पादन खर्च काढण्याची पद्धत सदोष असून त्यात शेतमजुरांची मजुरी, खते, बियाणे यांचा खर्च अत्यल्प दाखविला जातो. भांडवली गुंतवणुकीवरील व्याज ६% पेक्षा जास्त पकडत नाहीत. मजुरांची मजुरी 'कुशल' कामगारांप्रमाणे धरत नाहीत. शेतकऱ्यांचा खर्च प्रत्येक शिवाराचा वेगळा असतो. त्यामुळे नमुना (सॅम्पलिंग) किंवा सरासरी पद्धतीत त्रुटी आहेत. हा खर्च फक्त उत्पादन (cost of cultivation) म्हणजे शेताच्या बांधापुरताच आहे. त्यात मालाचा पणन खर्च– वाहतूक, आडत, तोलाई, हमाली वगैरे शेतकरी ते व्यापारी खर्च पकडला जात नाही.

ही माहिती केंद्र सरकारच्या निर्णायक कमिटीकडे - CCEA (Cabinet Committee on Economic Affairs) जाते. तिथे विविध राज्यांकडून आलेल्या माहितीवर चर्चा होते. यात जागतिक बाजारमूल्य, मागणी– पुरवठा, उत्पादनाचे प्रमाण, साठा या बाबींचा आढावा घेतला जातो. या बैठकीला इतर सर्व खात्यांचे मंत्री असून ते आपापले हितसंबंध बघतात. राजकारणी सत्ताधाऱ्यांना शहरी मतदार ग्राहकांची चिंता असते. भांडवलदार– उद्योगपतींचे हितसंबंध व निवडणूक अर्थपुरवठ्यासाठी तजवीज करायची असते. व्यापार (Commerce) खात्याला व्यापारी, रिटेलर, सेलर मार्केटची काळजी असते. अर्थखात्याला महागाई दर (Inflation Rate) कमीत कमी ठेवायचा असतो. गृहखात्याला ग्राहकांची व प्रसारमाध्यमांची ओरड होऊ द्यायची नसते. या सर्वांच्या दबावामुळे हमीभाव दाबले जातात व कमी जाहीर होतात. कारण साधे सरळ सूत्र आहे– कृषी क्षेत्राचा तोटा= इतर क्षेत्रांचा फायदा. थोडक्यात हा अर्थशास्त्रीय नसून राजकीय हेतूने प्रेरित निर्णय असतो.

प्रत्येक राज्याची पिकाची हवामान अनुकूलता, उत्पादकता (क्विंटल/ एकर), सिंचन सुविधा, पर्जन्यमान, प्रक्रिया उद्योग, कामगारांची उपलब्धता, क्रयशक्ती यामध्ये विविधता असल्यामुळे राज्यांनी केंद्राकडे शिफारस केलेल्या उत्पादन खर्चात प्रचंड तफावत असते. उदाहरणार्थ पंजाबध्ये ९८% सिंचनाखाली क्षेत्र आहे व महाराष्ट्रात १७.९% आहे. गव्हासाठी पंजाबचे हवामान अनुकूल आहे. त्यामुळे त्यांच्या आकडेवारीवरुन ठरवलेला हमीभाव महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांना तोट्याचा आहे. महाराष्ट्रात गव्हाचा उत्पादन खर्च १९०० रू. प्रतिक्विंटल आहे तर पंजाबमध्ये ७२० रू. प्रतिक्विंटल आहे. सन २०१९–२० च्या गव्हाच्या १९२५ रू. हमी भावाप्रमाणे पंजाबच्या शेतकऱ्यांना १२०५ रु. प्रति क्विंटल नफा मिळाला तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना २५ रु. नफा मिळणार.

केंद्र शासनाने जाहीर केलेले २०१९–२० चे हमीभाव हे महाराष्ट्र राज्य सरकारने शिफारस केलेल्या उत्पादन खर्चापेक्षा २५ ते ५३.७% कमी आहेत, हे सोबत जोडलेल्या आकडेवारीनुसार लक्षात येईल. अशीच लूट वर्षोनुवर्षे सुरू आहे, हेही यातून लक्षात येईल.

**पिके : धान, भुईमूग, कापूस, ज्वारी, सोयाबीन**– राज्य सरकारने प्रस्तावित केलेला उत्पादन खर्च रु. प्रतिक्विंटल **अनुक्रमे** : ३९२१, ९४१६, ७६६४, ३६२८, ५७५५; केंद्र सरकारने जाहीर केलेला हमीभाव रु. प्रतिक्विंटल (२०१९–२०) **अनुक्रमे** : १८१५, ५०९०, ५५५०, २५५०, ३७१०; तफावत (टक्के) **अनुक्रमे** : (–) ५३.७%, (–) ४५.९%, (–) २७.६%, (–)२९.७%, (–)३५.५%.

ही सर्व आकडेवारी सरकारचीच आहे. उत्पादन खर्चावर ५०% नफा वाढवायचे दूरच, जाहीर रक्कम खर्चापेक्षा ५०% कमी आहे. हमीभाव पेरणीच्या अगोदर जाहीर करणे अपेक्षित आहे. त्यालाही सरकार दोन महिने उशीर करते.

**२) स्वामिनाथन शिफारस** : स्वामिनाथन आयोगाने २००६ साली शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी केलेल्या अनेक शिफारशींपैकी एक महत्त्वाचा मुद्दा– उत्पादन खर्चावर ५०% नफा गृहीत धरुन शेतमालाचे भाव ठरविण्यात

यावेत. १६ वर्षे हा अहवाल धूळ खात पडला आहे. या आयोगाला वैधानिक दर्जा दिला नव्हता– जसा वेतन आयोगाला आहे; ज्यामुळे सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी सर्व केंद्र व राज्य शासनांच्या कर्मचाऱ्यांना लागू करणे कायदेशीर बंधनकारक आहे. कोणी म्हणेल इतर व्यवसायात व व्यापारात १५% नफा असतो. मग येथे ५०% का? त्याबाबत माझा अभ्यास असा आहे की शेतकऱ्यांचे शेतीमाल उत्पादन निघण्याचा व विक्रीचा काळ ८ महिने गृहीत धरला तर त्याचा Inventory Turn Ratio खूप कमी आहे. सोप्या भाषेत सांगायचे झाले तर वडापाववाल्याने १०० रु. ची सकाळी गुंतवणूक केली व त्याला संध्याकाळी ५% फायदा झाला तर त्याला दिवसाला ५ रु. मिळतील. तर ८ महिन्याला १२०० रु. म्हणजे नफा झाला १२ पट. त्याला ५% नफा कमी वाटत नाही कारण त्याचा Inventory Turn Ratio खूप जास्त आहे. तसेच व्यापाऱ्याचेही आहे.

**३) अंमलबजावणीतील अडचणी**

a) बाजारातील शेतमालाचे भाव हमीभावापेक्षा कमी झाल्यास सरकारने तो माल खरेदी करावा अशी कायदेशीर तरतूद आहे पण सरकारजवळ खरेदी करणारी सक्षम यंत्रणाच नाही. २३ पिकांपैकी फक्त ३–४ पिकांचीच शासन खरेदी करते, ती पण पूर्ण नाही. सन २०१६–१७ साली सरकारने तुरीची ३३%, हरभरा १०% व सोयाबीनची अर्धा टक्केच खरेदी केली. बाकी ९०% माल शेतकऱ्यांना पडत्या दराने विकावा लागला.

b) खरेदी केंद्रे सुरु करावीत म्हणून शेतकऱ्यांना वारंवार आंदोलने करावी लागतात.

c) पूर्वीचा कटू इतिहास उलगडल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. तूर खरेदीसाठी शेतकरी २ कि.मी. लांब रांगेमध्ये उभे होते, तूर भिजत होती. एवढे झाल्यावर एफ.ए.क्यू. च्या निकषाने शेतकऱ्यांची तूर नाकारली जात होती. केंद्र सरकारच्या भारतीय खाद्य निगम (Food Corporation of India) नी एफ.ए.क्यू. (Fair Average Quality) चे १० किचकट निकष दिले आहेत. ज्यात खडे २%, आर्द्रता १२% कमाल अशी बंधने आहेत. शेतकऱ्यांनी वैतागून परत जाऊन कमी भावाने व्यापाऱ्यांना माल विकला. तोच माल व्यापाऱ्यांनी इतरांचे सातबारा उतारे काढून खरेदी केंद्रात विकला. अशा रितीने ग्रेडर, व्यापारी व अधिकारी यांच्या साखळीतून प्रचंड भ्रष्टाचार झाला. काय उपयोग 'ऑनलाईन रजिस्ट्रेशन करा' म्हणून वर्तमानपत्रात जाहिरात येते त्याचा?

d) शासनाने कधी बारदाने नाहीत, तर एकदा सुतळी नाही तर कधी गोदामे नाहीत, कधी नियोजन चुकले असे स्पष्टीकरण देऊन हसे केले. ग्रेडर नसल्यामुळे कापसाची खरेदी रखडली जाते, ठप्प होते.

e) तूर, हरभऱ्याचे ६८७ कोटी रुपयांचे चुकारे नाफेडकडून तीन महिन्यांपासून थकले. कापूस उत्पादक पणन महासंघाकडून ५०० कोटी रू. येणे बाकी. अशा बातम्या वाचून संताप येतो. शेतकऱ्यांचे हक्काचे पैसे देण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत? नाफेड २०% रक्कम भरते. इतर केंद्रांची मदत येते तेव्हा पैसे मिळतात.

f) अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत रेशन व्यवस्थेला अन्नपुरवठा करण्यासाठी नियोजित साठा भरला की वरुन आदेश येतात खरेदी बंद करा.

g) शेतमालाचे भाव पडण्याचे मुख्य कारण अतिरिक्त उत्पादन नसून वेळोवेळी केलेली आयात हेच आहे. आवश्यक वस्तू कायद्याचा आधार घेऊन तूर १३५ रु./ किलोने आयात केली व येथे शेतकऱ्यांना ३५ रु./ किलोने विकावी लागली. पाकिस्तानातून ४६ रु. किलोने कांदा आयात केला व इथल्या शेतकऱ्यांना १० रु. भाव मिळाला नाही.

निर्यातबंदी केली जाते व आपल्या शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेतील चढ्या दराचा फायदाही मिळू दिला जात नाही.

**४) दीडपट हमीभावाची दिशाभूल (२०१८–१९)** :– २०१४ सालच्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात भाजपाने स्वामिनाथन आयोगाच्या ५०% नफ्याच्या शिफारशीची अंमलबजावणी करु, असे आश्वासन दिले होते. नंतर एका याचिकेला उत्तर देताना केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दीडपट भाव देणे शक्य नाही असे प्रतिज्ञापत्र लिहून दिले.

सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास २०१८–१९ च्या हमीभावाची २०१७–१८ च्या हमीभावाशी तुलना केल्यास असे लक्षात येते की तुरीसाठी ४.१%, धानसाठी १२.९%, भुईमुगासाठी ९.९% अशी नगण्य वाढ ऐतिहासिक कशी?

केंद्राने जाहीर केलेल्या हमीभावावर १० राज्यांनी– प. बंगाल, छत्तीसगड, हरियाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश, तामीळनाडू, ओरिसा, कर्नाटक, पॉन्डेचरी व महाराष्ट्राने सुद्धा नाराजी व्यक्त करून पत्रे लिहिली. त्यावर केंद्राने नकार दिला व राज्यांनी शेतकऱ्यांना बोनस पण न देण्याची ताकीद दिली.

शांताकुमार समितीनुसार (२०१५ अहवाल) फक्त ६ टक्के शेतकऱ्यांकडून हमीभावाने खरेदी होते. अर्थात काही विचारवंत आपली बाजू पटवून देण्यासाठी, याचा नकारात्मक व सोयीचा अर्थ काढतात. पण ही आकडेवारी खोटी असेल तर अन्नसुरक्षा कायद्याअंतर्गत ८०.३ कोटी लोकांना, रेशन व्यवस्थेमार्फत धान्यपुरवठा कसा शक्य आहे? आणि खरी असेल तर उरलेल्या ९४% शेतमालाचे काय? त्याचबरोबर हे

प्रमाण कसे वाढले पाहिजे यासाठी सरकारने प्रयत्न करून, पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक केली पाहिजे. कृषी आयोगावर घालून दिलेल्या निर्देशाप्रमाणे या कमिटीमध्ये दोन अशासकीय सदस्य- एक कृषी क्षेत्रातील अभ्यासक आंदोलक व दुसरा प्रत्यक्ष शेतीशी निगडित शेतकरी, अशी रचना आहे. परंतु या प्रतिनिधींना स्थान देण्यात आले नसल्यामुळे जाहीर केलेले दर अवैध आहेत. जिज्ञासू अभ्यासकांसाठी खोलात शिरुन स्पष्टीकरण देतो. पिकांचा उत्पादन खर्च काढताना आयोग तीन व्याख्या वापरतो.

**ए २** : पीक पिकवताना शेतकरी बियाणे, खते, रासायनिक औषधे, मजूर, सिंचन, इंधन आदी वस्तूंवर जो खर्च करतो तो ए २ मध्ये मोजला जातो. **ए २ + एफ.एल.** : वरील खर्चासोबतच शेतकरी व त्याच्या कुटुंबियांनी शेतात केलेल्या कामाची मजुरी हिशेबात धरली जाते. **सी २** :- यात वरील सर्व खर्च अंतर्भूत असून शिवाय शेतजमिनीचे भाडे, स्थायी भांडवली साधन सामुग्रीवरील व्याज, घसारा व दुरुस्तीवर येणारा खर्च पकडला जातो. ही व्याख्या अधिक व्यापक, रास्त, सर्वसमावेशक व समग्र (Comprehensive) आहे.

स्वामिनाथन आयोगाने सी २ खर्चाच्या दीडपट हमीभाव देण्याची शिफारस केली आहे. पण केंद्राने सी २ हा खर्च गृहीत न धरता आकड्यांचा खेळ केला आहे व (ए २ + एफ एल) वर आधारित किंमत जाहीर केली.

**५) नाशवंत पिके** : कृषी आयोगाने जाहीर केलेल्या हमीभावामध्ये दूध, फळे, भाज्या, फुले या महत्त्वाच्या कृषी उत्पादनांचा समावेश नसतो. या नाशवंत पिकांच्या बाजारातील किंमतीच्या चढउतारापासून शेतकऱ्याचे संरक्षण व्हावे म्हणून स्वतंत्र 'मूल्य स्थिरता निधी' ची स्थापना व्हावी, असेही स्वामिनाथन यांनी सुचविले आहे. या मागणीचा पाठपुरावा करताना कोणी दिसत नाही.

नुकतेच केरळ राज्याने १६ फळे व भाजीपाल्याचे किमान भाव (एम.एस.पी.) जाहीर केले आहेत, जे उत्पादन खर्चापेक्षा २०% जास्त, यावर आधारित आहेत.

**६) कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा** (APMC) : सन १९९१ साली भारतात मुक्त अर्थव्यवस्था, जागतिकीकरण आले. पण आजही शेतकऱ्यांना आपला शेतीमाल तालुक्याच्या समितीच्या आवारात विकावा लागतो, अन्यथा गुन्हा होतो. याचे दुष्परिणाम सांगणारे एकच उदाहरण देतो. लासलगाव ही आशियातील सर्वात मोठी बाजारपेठ असून, जगातील १०% उलाढाल तिथे होते. त्या परिसरात २५,००० शेतकरी आहेत व फक्त २७ व्यापारी आहेत. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व अधियमन) अधिनियम १९६३ मधील, कलम नंबर ३२ K प्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील व्यापाऱ्यांना असे बंधन आहे की त्यांनी केंद्र सरकारने जाहीर केलेल्या शेतमालाच्या आधारभूत किंमतीपेक्षा कमी दराने खरेदी करू नये. पण हे कोणीही पाळत नाही. आजपर्यंत कोणावरही कारवाई नाही.

**७) उत्पादकतेनुसार खरेदीवर मर्यादा** : शेतकऱ्यांना राज्यातील प्रत्येक, ३४ जिल्ह्यांनुसार, उत्पादकतेच्या आधारावर, नाफेडमार्फत खरेदीवर मर्यादा घालण्यात आल्या आहेत. पण अशी मर्यादा हवीच कशाला? उरलेला शेतमाल परत घेऊन जायचा का? त्यामध्येही प्रचंड तफावत आहे. उदा. तुरीसाठी, सन २०२१-२२ हंगामात जालना व नागपूर जिल्ह्यांसाठी सर्वाधिक उत्पादकता हेक्टरी १५ क्विंटल तर धुळे जिल्ह्यात सर्वात कमी १.५० क्विंटल आहे. दोन जिल्ह्यांत एवढी दसपट तफावत आहे तर पूर्ण भारतातील विविध राज्यांमध्ये किती फरक असेल? म्हणून आमची मागणी आहे की कृषी मालाचे हमीभाव ठरविण्यासाठी स्वायत्तता/ अधिकार त्या त्या राज्यांच्या कृषी मूल्य आयोगाकडे द्यावेत.

**८) हमीभाव कायदा** : दिल्लीच्या सीमेवर शेतकऱ्यांचे आंदोलन चालू होते. खासगी खरेदीदारांना हमीभावाचे कायदेशीर बंधन घालावे व त्यापेक्षा कमी भावाने खरेदी केल्यास फौजदारी गुन्हा ठरवावा, अशी त्यांची महत्त्वाची एक मागणी आहे. पण यात असा आक्षेप घेतला जातो की भाव गडगडले असल्यास कोणीही व्यापारी तोटा सहन करून शेतकऱ्यांचा माल खरेदी करणार नाही व माल ठप्प राहण्याचा धोका आहे. परंतु आपल्याकडे ऊसाचा एफआरपी देण्याचे वैधानिक बंधन आहे. त्या व्यवस्थेचे यशस्वी मॉडेल राबवले जात आहे. त्यामुळे असे कायदेशीर कवच देणे योग्य राहील.

**९) भावांतर योजना** : खरेदी केंद्र सुरू करण्यास सरकारची असमर्थता असेल तर त्यांनी प्रत्यक्ष विक्रीभाव व हमीभावातील फरक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करणे.

**१०) इतर उपाय योजना व मागण्या**

* मध्यप्रदेशातील 'भावांतर योजने'तील आढळलेल्या त्रुटी काढून त्या योजनेची महाराष्ट्रात अंमलबजावणी करावी. * कृषिमालाचे हमीभाव ठरविण्यासाठी स्वायत्तता/ अधिकार त्या त्या राज्यांच्या कृषिमूल्य आयोगाकडे द्यावेत. * आवश्यक वस्तू कायदा रद्द करावा. * स्वामिनाथन शिफारशींची खरी अंमलबजावणी करावी. * शेतकऱ्यांना थेट आर्थिक प्रोत्साहन द्यावे. * कृषी प्रक्रिया उद्योगात प्रचंड गुंतवणूक करावी. * खरेदी केंद्र आधिकारी व व्यापाऱ्यांच्या मिलीभगतमधून होणाऱ्या भ्रष्टाचार करणाऱ्यांवर कडक कारवाई करून आळा बसवावा. * केरळ राज्याप्रमाणे फळे व भाजीपाल्याचे किमान भाव (एम.एस.पी.) जाहीर करावेत. * दुधाला एफआरपी द्यावा. ■